जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- / १०९ /२०१५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- २१.११.२०१५

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## सर्वसाधारण सभेची सूचना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची 'ड' चे प्रकरण-2 मधील नियम क्र.1 अन्वये

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र .१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर **सौ.शैलजा किशोर स्वामी** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दि. ३०.११.२०१५ रोजी सकाळी ११.०० वा.** नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै .शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

महापौर,
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति
श्री/श्रीमती ------------------------------------------------------------
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## कार्यक्रम पत्रिका

**विषय क्र.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मुला मुंलीचे गुणोत्तर-२०१५ प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिणा | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणौत्तर प्रति हजार मुलीचे प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| १ | जानेवारी | १३११ | ११८८ | २४११ | ९०६.१७ |
| २ | फेब्रूवारी | १००४ | ९४१ | १९४५ | ९३७.२५ |
| ३ | मार्च | १०३३ | ९७७ | २०१० | ९४५.७८ |
| ४ | एप्रिल | १४७२ | १३२२ | २७९४ | ८९८.०९ |
| ५ | मे | ९८३ | ९१५ | १८९८ | ९३०.८२ |
| ६ | जून | १२२० | ११४९ | २३६९ | ९४१.८० |
| ७ | जूलै | ११२३ | ९४७ | २०७० | ८४३.२७ |
| ८ | ऑगस्ट | ११६१ | १११० | २२७१ | ९५६.०७ |
| ९ | सप्टेंबर | १७०३ | १५४३ | ३२४६ | ९०६.०४ |
| १० | ऑक्टोबर | १५६८ | १४१८ | २९८६ | ९०४.३३ |
| | एकूण | १२५७८ | ११५१० | २४०८८ | ९१५.०८ |

**विषय क्र.२**

शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्यातील सर्वसाधारण सभेच्या विषय सूचीवर कायमस्वरुपी समावेश करुन या विषयाचा सविस्तर आढावा सभेमध्ये घेण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येते सदरचा विषयक कायमस्वरुपी सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

आजपर्यंत केलेली कार्यवाही-

- एकुण 4202 पात्र /अपात्र लाभार्थ्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच क्षेत्रिय कार्यालयात डकविण्यात आलेली आहे.

| झोन क्र. | घरांची संख्या | वैयक्तीक शौचालय आहे | वैयक्तीक शौचालय नाही |
|---|---|---|---|
| अ | 14041 | 13069 | 957 |
| ब | 30292 | 28464 | 974 |
| क | 34400 | 33145 | 1151 |
| ड | 14304 | 13173 | 1120 |
| एकुण | 93037 | 87851 | 4202 |

| एकुण केंद्र शासनाच्या अपलोड अर्ज | तपासलेले अर्ज | मान्यता दिलेले अर्ज | नामंजुर केलेले अर्ज |
|---|---|---|---|
| 3546 | | 792 | 152 |

- नांदेड वाघाळा शहर हागणंदरीमुक्त करण्यासाठी 2 ऑक्टोंबर, 2017 ही तारीख अंतीम केलेली असुन त्याप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे. मार्च 2016 अखेर 1700 वैयक्तीक शौचालयाचे बांधकामाचे उद्दिष्ठ ठरविण्यात आलेले आहे.
- घनकचरा व्यवस्थापनासाठी नियोजन चालु आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत मार्गदर्शक सुचनेनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**विषय क्र.३**

शासन निर्णय क्रं –अग्रीम -२०१५ /प्र क्र५७/१५/विनियम तारीख २६ ऑक्टोंबर २०१५ च्या शासण निर्णय नूसार दि १ जानेवारी २००६ पासून सुधारीत करण्यात आलेल्या वेतन संरचनेतील ज्या अराजपत्रीय राज्य शासकीय कर्मचा-यांना ग्रेडवेतन ४८०० पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रीय कर्मचा-यांना रू १००००/- सण अग्रीम अनुज्ञेय केलेली आहे त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र.नावाशमनपा/लेवि/९७२३/२०१५ दि.२८ऑक्टोंबर २०१५ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनाही १ दिवाळी २ रमझान इद ३ख्रिसमस ४ पारसी नववर्ष ५ संवत्सरी ६ रोश-होश्सना ७र्वाशाखी पोर्णिमा(भगवान बुध्द जयंती ) ८ स्वातंत्र दिन ९ प्रजासत्ताक दिनास यापुढे सण अग्रीम रक्क्म रूपये १०,०००/- देण्याची रक्कम अदा करण्यासाठी २३५ कर्मचा-यांना प्रत्येकी अग्रीम रक्क्म रूपये १०,०००/- याप्रमाणे लागणा-या खर्चास आदेश क्र .नावाशमनपा/लेवि/९७२४/२०१५ दि.२८.१०.२०१५ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(3) नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे स्थायी समितीचे 16 सदस्यापैकी खालील (8) सदस्य दि.1.12.2015 रोजी दुपारी निवृत्त होत आहे.

सर्वश्री

1 विनय विश्वाबंरराव पाटील, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी
2 पवळे उमेश देवराव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी
3 वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी
4 गाडगे शंकर जयवंतराव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी
5 चाऊस हसीना बेगम साबेर, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी
6 किशोर किशनलाल यादव, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस अपक्ष आघाडी
7 अ. हबीब अ. रहिम बागवान एम.आय.एम., एम.आय.एम. संविधान आधाडी
8 बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला, एम.आय.एम. संविधान आधाडी

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(5) अन्वये नांवामनपाकेच्या स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या वरील सदस्यांच्या रिक्त (8) जागावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 31 अ नुसार नविन (8) सदस्यांची नामनिर्देशानाव्दारे नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

टिपः- शासन परिपत्रक क्र.संकिर्ण 2010/प्र.क्र.-85/नवि-32 दि.6 जूलै 2010 नुसार विरोधी पक्ष नेते,सभागृह नेते, गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्याची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नांवे पाठवितांना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौराकडे देण्यात यावीत.सभेच्या दिवसापुर्वी सदर नांवे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयात, आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी .

**विषय क्र.५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हध्दीत माता गुजरीजी विसावा उद्यानासोबत लहान मोठे चौदा उद्याने अस्तीत्वात आहे.सदरील उद्यानामध्ये मुलांच्या विरंगुळयासाठी विविध खेळणी साहित्य,मेरीगो राऊंड व ट्रेन लावलेले आहेत. विरंगुळयाच्या साहित्यासोबत उद्यानामध्ये विस्तीर्ण लॉन, वृक्षवल्ली ,अंतर्गत रस्ते,दिवाबत्ती ,पाण्याची सोय आहे.

उद्यानाच्या देखभाल दुरुस्ती व दैनंदिन रखवालीसाठी सध्या मनपाचे जळपास ९० कर्मचारी कार्यरत आहेत. सदरील मनुष्यबळाचा मासिक वेतनावर होणारा खर्च तसेच उद्यानापासून मिळणारे उत्पन्न याचा ताळमेळ पाहता मोठया प्रमाणामध्ये तुट दिसून येते. उत्पन्न कम व होणारा खर्च जास्तीचा आहे. सदरील कामे पार पाडण्याकरीता कर्मचा-यांची कमतरता भासत असून उद्यानांच्या देखभाल व दुरुस्तीवर इतर कामामूळे परिणाम होवून उद्यानाचा दर्जा खालावला आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता पाहता उद्यानांचा दर्जा उत्तम राहणे व शहरातील उद्यान विभागाशी निगडीत कामे व्यवस्थित पार पाडण्याकरीता विविध उद्यानांचा Public private partnership चा पर्याय अवलंबविल्यास कर्मचा-यांच्या पगारावरचा बोजा कमी होवून इतर कामासाठी कर्मचारी उपलब्ध्द होतील. व नागरीकांना उद्यानामध्ये चांगल्या प्रकारच्या सुविधा देणे शक्य होईल.

वरील सर्व बाबीचा विचार करता माता गुजरीजी विसावा उद्यानासोबत नांदेड शहरातील महत्वाचे उद्यानाचे Public private partnership केल्यास नागरीकांना उत्म प्रकारची सेवामिळेल व उद्यान विभागाचे कर्मचारी इतर कामाकरीता उपलब्द होतील. नांदेड शहरातील महत्वाचे खालील प्रमाणे सात उद्याने Public private partnership धर्तीवर चालविण्यास देता येणे शक्य आहे.

१) माता गुजरीजी विसावा उद्यान – झोन ब
२) नाना नानी पार्क – झोन ब
३) वेणू गोपाल बियाणी उद्यान ,जुनामोंढा टॉवर - झोन क
४) किल्ला उद्यानप - झोन क
५) चौफाळा उद्यान – झोन क
६) सिडको मध्यवर्ती उद्यान – ड
७) गोदावरी गृहनिर्माण सोसायटी उद्यान – झोन ड

उपरोक्त सर्व बाबीचा विचार करता इतर महानगरपालिकेच्या धर्तीवर Public private partnership अंतर्गत वरील उद्याने चालवण्यास देण्याबाबत सर्वसाधारण सभे समोर प्रस्ताव सादर

**विषय क्र.५**

नांवामनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४५ दि.३१.३.२०१५ अन्वये मनपा हद्यीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी तत्कालिन उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली,सौ.सुदर्शना महेश खोमणे, श्री प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम केली होती, (या उप समितीचे स. सदस्य श्री श्री प्रमोद खेडकर, व श्री स.शेर अली यांनी दि.९.१०.२०१५ रोजी राजीनामा दिलेला आहे. ) या उपसमितीने दि.३१.१०.२०१५ रोजी मा.महापौर नांवामनपा नांदेड यांच्याकडे खालील प्रमाणे आपला अहवाल सादर केलेला आहे त्यावर विचार करणे बाबत.

**<u>मनपा हृध्दीत विविध भागात रिलायन्स ४ जी या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे कामाची तसेच शहरात उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अहवाल</u>**

नांवामनपा सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४५ दि.३१.३.२०१५ अन्वये मनपा हद्यीत विविध भागात रिलायन्स 4G या अंतर्गत भूमिगत केबल लाईन टाकण्याचे काम त्वरीत थांबविण्यात यावे तसेच सदर कंपनीचे मोबाईल टॉवर उभे करण्याचे अथवा त्यास केबल जोडणीचे काम चालू असल्यास ते देखील तात्काळ थांबविण्यात यावे. तसेच सदरील झालेले काम व पुढे काम सुरु करण्याच्या निर्णय घेण्यासाठी उपमहापौर श्री आनंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली श्री उमेश चव्हाण, श्री स.शेर अली,सौ.सुदर्शना महेश खोमणे, प्रमोद खेडकर, श्री गिरीष कदम,कार्यकारी अभियता यांची एक उपसमिती कायम करण्यास मान्यता देवून समितीचा मंजुरी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय मनपा प्रशाससनाने सदरील काम सुरु करण्यात येवू नये.असा ठराव संमत केला होता.

सदर ठरावान्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये उपरोक्त समितीचे अध्यक्ष श्री आनंद चव्हाण यांच्यास अध्यक्षतेखाली व उपसमितीचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत दि.१३.४.२०१५ व दि.१४.७.२०१५ रोजी बैठक घेवून या बैठकीत सदस्यांनी काही सुचना व माहिती मागविलेली होती. या अनुषंगाने सविस्तर चर्चा विनिमय होवून सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन उपसमिती खालील प्रमाणे निष्कार्षावर आली.त्यासबंधीचा चौकशी अहवाल.

१) मा.आयुक्तांना बाधकाम उपविधी मधील नियम ३२ (१) (इ) चा वापर फक्त महानगरपालिका बिल्डींग बॉयलॉज अंतर्गत मनपा हदीतील बिल्डींग परवानगीसाठीच वापरण्याचे अधिकार आहेत. मोबाईल टॉवरर्स उभारण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने दि.४ मार्च २०१४ रोजी एक वेगळी उपविधी केली आहे. त्या उपविधीचा वापर न करता मा.आयुक्तानी बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चा वापर करुन त्यांच्या विशेष अधिकारात रिलायन्स कंपनीच्या २६ मोबाइल टॉवर ला परवानगी दिलेली आहे. मोबाइल टॉवर उभारण्यासाठी एनओसी देण्याकरीता महाराष्ट्र शासनाने ४ मार्च २०१४ चे जे राजपत्र काढलेले आहे त्यामध्ये २१ प्रकारच्या अटी व शर्ती टाकण्यात आलेल्या आहेत.त्याची पूर्तता न करता उदा.इमारत १५ मिटरपेक्षा उंच असणे ,रोड विडथ ,फायर एनओसी ,बांधकाम पुर्णत्वाचा दाखला इमारतीचे स्ट्रक्चरला ऑडीट तपासण्यात आले नाही,विकास खर्च वसुल करण्यात आलेला नाही. ही बाब मोबाइल टॉवर उभारण्याकरीता एनओसी देण्यात आलेल्या आहेत.जे की बेकायदेशिर व महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द आहे त्यामूळे देण्यात आलेल्या परवानग्या रध्द करण्यात याव्यात.

२) बांधकाम उपविधीमधील नियमा अंतर्गत नियम ३२ (१) (इ) चे वापर करुन प्रस्ताव धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेच्या महासभेपुढे आणणे आवश्यक असतांना तसा प्रस्ताव महासभेकडे आणण्यात आलेला नाही.

३) मोबाईल टॉवर ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे जरुरीचे होते तर शासनाने केलेली टॉवरर्स उभारणीचे दि.४.३.२०१५ च्या उपविधीनुसार काही शंका असल्यास त्याचे निरसण करण्यास नियम १० नुसार शासनाचे मार्गदर्शन घेतलेले नाही.

४) जर मोबाईल टॉवर विना परवानगीने उभारण्यात आलेले असतीलन तर पुणे व इतर महानगरपालिकेने तडजोड शुल्क आकारुन दंड लावून परवानगी अधिकृत केली त्याप्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अमलबजावणी झालेली नाही. यामूळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला रोड खोदण्याची परवानगी देण्यात आली व त्याचे रिस्टोरेशन चार्जेस हे कमी असून तेथ दर जर पुणे व इतर महागनरपालिकेच्या धर्तीवर वसुल केले असते तर नादेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते.

६) ४ जी अंतर्गत रिलायन्स कंपनीला परवानगी दिलेल्या मंजुर नकाशापेक्षा जास्त खोदकाम झालेले आहे. जास्तीचे झालेले खोदकामावर दंड लावून ते सबंधित कंपनीकडून वसुल करावयास पाहिजे होते ते करण्यात आलेले नाही. तसेच महानगरपालिकेचया मलनिस्सारण व पाणी पुरवठा विभागाचा अहवाल देखील घेण्यात आलेला नाही.

७) महानगरपालिकेच्या जमिनीचे भू भाडे व रोड रिस्टोरेशन चार्जेस,मोबाईल टॉवरचे दर ठरविण्याचा अधिकार महानगरपालिकेच्या स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेस असतांना तसे न करता मा.आयुक्त यांनी स्वत:च्या अधिकारात भू भाडे ठरविले त्यामूळे इदतर महानगरपालिकेच्या तुलनेने ते भू भाडे नांदेड वाघाळा शहर महागनरपालिकेने कमी दराने घेण्यात आले असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.व तसेच रिलायन्स ४ जी कंपनीशी करार करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ (क) (ड) अंतर्गत येणा-या तरतूदीची पण पायमल्ली करुन करारनामा करण्यात आलेला आहे.

८) मा.महापौर व मा.आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना दि.१.७.२०१५ रोजी रिलायन्स ४ जी अंतर्गत केंबल टाकण्याचे व मोबाईल टॉवर उभारण्याचे काम चालू आहे. ते त्वरीत थांबविण्या बाबतचे व संबंधित कामामध्ये अनियममितता झाल्यामूळे त्यांची चौकशी करण्यासाठी उपसमितीच्या सदस्यांनी पत्र दिले होते.

९) दि.३१.३.२०१५ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यावर सुध्दा सर्वसधारण सभेच्या निर्णयाची दखल न धेता व उपसमिती गठित असतांना देखील रिलायन्स कंपनीला केबल टाकण्यासाठी दि.२७.४.२०१५ ला रस्ता खोदकामाची परवानगी देण्यता आली तसेच दि.११.५.२०१५ रोजी (२७) मोबाईल टॉवरला ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्यामूळे मा.आयुक्त यांनी घेतलेल्या निर्णयाशी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचे अध्यक्ष व उपसमितीचे सदस्य यांच्यात मतभिन्नता आहे.

तरी रिलायन्स कंपनीला मोबाईल टॉवर उभारण्यासाठी व रिलायन्स ४ जी चे भूमी अंतर्गत केंबल टाकण्यासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र व समती देण्यात आलेली आहे ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनूसार व शासन राजपत्रातील अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याची डायरेक्ट ऑफ टावून प्लॅनिंग पुणे व मा.प्रधान सचिव,नगरविकास मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत् सविस्तर चौकशी करण्यासाठी ही गठित केलेली उपसमिती एकमताने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस शिफास करते.

स्वाक्षरीत/-
आनंद चव्हाण

स्वाक्षरीत/-
उमेश अशोकसिंह चव्हाण

स्वाक्षरीत/-
एस.एम.खोमणे

नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

महापौर,
.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.